नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १२७ Issue - 127 | वार बुधवार दि. २४ सप्टेंबर २०२५ Blow- Wednesday Date 24 September 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्याकडून शेतकऱ्यांना २२१५ कोटी रुपयांची मदत जाहीर

## राज्यात अतिवृष्टी, सरासरीच्या १०२ टक्के अधिक पाऊस; जमीन खरडून गेलेल्या शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची महत्त्वाची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात गेल्या काही दिवसांपासून अतिवृष्टी सुरु आहे. आतापर्यंत ९७५.५ मिलिमीटर पाऊस पडला आहे. हा सरासरीच्या १०२ टक्के अधिक पाऊस आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना दिल- ासा देण्यासाठी शक्य ते सर्व निर्णय घेतले जातील. शेतीच्या नुकसानीचे पंचनामे होतील तशी तातडीने मदत दिली जाईल. संपूर्ण भागाचे पंचनामे होईपर्यंत सरकार थांबणार नाही. आतापर्यंत राज्य सरकारने ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना २२१५ कोटी रुपयांची मदत करण्याचे जीआर काढले आहेत. यापैकी १८२९ कोटी रुपये संबंधित जिल्ह्यांमध्ये पोहोचले आहेत. शेतकऱ्यांच्या बँक खात्यात नुकसानभरपाई जमा होण्यास सुरुवात झाली आहे. येत्या आठ-दहा दिवसांम ध्ये उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होतील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्यातील पूरपरिस्थिती गंभीर असल्याचे म्हटले. पूरपरिस्थितीम ुळे काही भागात लोक अडकले आ- हेत. बीड, धाराशिव या परिसरात रेस्क्यू ऑपरेशन सुरु आहे. धाराशिव आणि बीड परिसरात बचाव मोहीम सुरु आहे. धाराशिव जिल्ह्यात २७ जणांना हेलिकॉप्टरने बाहेर काढण्यात आले आहे. तर २०० लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. अहिल्यानगर, बीड, परभणी, जळगाव आणि सोलापूर या भागांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. यामध्ये आठ जणांचा मृत्यू झाला आहे तर १० जण जखमी झाले आहेत. या परिसरात एनडीआरएफ आणि एसडीआरएफ यांच्या १७ तुकड्या तैनात आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या पंचनाम्याचे आद- ेश यापूर्वीच दिले होते. सगळे पंचनामे झाल्यावर एकत्रित मदत करण्याऐवजी जसे पंचनामे होतील, तशी तातडीने मदत करण्याचे धोरण राज्य सरकारने अवलंबिले आहे. आम्ही सातात्याने जीआर काढत आ- होत, एक सिंगल जीआर नाही, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. आतापर्यंत शेतकऱ्यांसाठी १८२९ कोटी रुपयांची मदत ग्राऊंडवर पोहोचली आहे. पण यासोबत नवीन ठिकाणी पाऊस सुरु आहे, तेथील पंचनामे करुन मदत करण्याचे काम सुरुच राहील.

सध्या एखाद्या जिल्ह्यात कमी म दत दिसत असेल तर ते प्रमाण नंतर वाढेल. आता एखाद्या तालुक्याचा नुकसानभरपाईचा अहवाल आधी आला तर त्यांना मदत करायची, हे आपले धोरण आहे. जेणेकरुन शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळाली पाहिजे, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. याशिवाय, पावसामुळे झा- लेले मृत्यू आणि दुर्दैवी घटनांसाठी मदत करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांन देण्यात आले आहे. मृत जनावरे आणि घरांच्या नुकसान भरपाईची मदत देण्याचे अधिकारही आपण स्थानिक पा- तळीवर दिले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत सर्व जिल्ह्यांम धील पावसाच्या परिस्थितीचा सविस्तर आढाव घेण्यात आला.



उद्या सर्व पालकमंत्री पूरग्रस्त भागांना भेटी देतील. मी स्वत: काही भागांमध्ये जाणार आहे. जिथे मोठ्याप्रमाणात मदतकार्य सुरु आहे, तिकडे अडथळा येऊ नये, अशा पद्धतीने हे दौरे सुरु रा- हतील, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी आग्रही मागणी विरोधक आणि शेतकरी करत आहेत. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारले असता त्यांनी यावर स्पष्टपणे बोलणे टाळले. त्यांनी म्हटले की, याठिकाणी जे काही नुकसान झालं आहे, जेवढ्या पद्धतीची मदत आपल्या नियमांमध्ये आहे, तेवढी आम्ही देऊ. खरडून गेलेल्या जमिनींसाठी जीआर आहे, मदत करता येते, नरेगाच्या माध्यमातून आपण मदत करतो. खरडून गेलेल्या जमिनींसाठी मदत करण्यासाठी जे निकष आहेत, त्यामध्ये बदल करावेत, अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली होती. राज्य सरकार त्याविषयी सकारात्मक विचार करत आहे. केंद्र सरकारकडून मदत येण्यासाठी वेळ लागेल. कारण सगळे मूल्यमापन करुन एकच प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवला जातो, नंतर मदत येते. मात्र, केंद्र सरकारने आपल्याला एनडीआरएफतंर्गत अगोदरच पैसे दिलेले असतात. ते पैसे आपण खर्च करतो. केंद्र सरकार निश्चितच मदत करेल, पण तोपर्यंत राज्य सरकार थांबणार नाही. आम्ही शक्य ती तातडीची मदत शेतकऱ्यांना करुन, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ जाणार शेतकऱ्याच्या बांधावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठवाड्यात आलेल्या महापुराच्या परिस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झालं असून अनेकांना स्थलांतर करावं लागलं आहे. या महापुरात शेती पिकं जमीनद- ोस्त झाली असून अनेक जनावरंही दगावली आहेत. यामध्ये आतापर्यंत ८ जणांचा जीव गेला असून अनेक ठिकाणी बचाव पथकाचं कार्य अद्याप सुरू आहे. मराठवाड्यात अतिवृष्टी झालेल्या ठिकाणांची पाहणी आता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह सर्वच मंत्री करणार आहेत. तसेच त्या त्या जिल्ह्यांचे पालकमंत्रीही दौऱ्यावर असणार आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस बुधवारी सोलापूर आणि लातूर जिल्ह्याचा दौरा करणार आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवारही सोलापूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा घेणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे धाराशिव जिल्ह्यातील पूरस्थितीचा आढावा घेणार आ- हेत. पालकमंत्री त्या त्या जिल्ह्यांच्या दौऱ्यावर जाणार असून पूरस्थितीची पाहणी करणार आहेत.

मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत आतापर्यंत जवळजवळ २३ टक्के शेतीचं नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

विशेषतः मराठवाड्यात अतिवृष्टी, ढगफुटी, पूराने थैमान घातलंय. या आठवड्यात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. अशा स्थितीत बळीराजा आणि सर्वसामान्यांना तातडीने दिलासा देण्याची गरज असल्याचं विरोधी पक्षांचे नेते सांगत आहेत.

## सोलापूर जिल्ह्यातील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शोध व बचाव कार्यासाठी अन्य जिल्ह्यातून मनुष्यबळासह ११ बोटी मागविल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, दिनांक २३(जिम ाका):- जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून सातत्याने पाऊस व अतिवृष्टी होत आहे. तसेच उजनी धरणातून भीमा नदीत तसेच सीना कोळेगाव प्रकल्पातून सीना नदीत मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सोडला जात असल्याने माढा, करमाळा, मोहोळ, पंढरपूर, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर या तालुक्यातील अनेक गावे पुराच्या पाण्यात अडकलेली आहेत.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने या सर्व नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. परंतु अतिरिक्त बचाव पथके आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काल रात्रीपासून अन्य जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून अकरा बोटी पुरेशा मनुष्यबळासह उपलब्ध करून घेतल्या असून त्या आज दुपारपर्यंत घटनास्थळी दाखल होऊन बचाव कार्याला अधिक गती मिळणार आहे. यामध्ये कोल्हापुर ३, लातूर १, सांगली ३, इंदापूर २, नांदेड २ अशा ११ कोटी म ागवण्यात आलेल्या आहेत.

त्याप्रमाणेच माढा तालुक्यातील दारफळ येथे पुराच्या पाण्यात अनेक नागरिक अडकले असून एनडीआरएफ टीमचे पथक बचावासाठी गेले होते परंतु पुराच्या पाण्याचा प्रवाह खूप गतीने येत असल्याने त्यांना त्या नागरिकांना सुखरूप ठिकाणी बाहेर काढणे शक्य झालेले नव्हते त्यामुळे सैन्य दलाची चर्चा करून जिल्हा प्रशासनाने त्या नागरिकांना एअरलिफ्टद्वारे सुखरूप ठिकाणी बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले आहेत. लवकरच आर्मीचे हेलिकॉप्टर पथक दारफळ येथे पोहोचून सर्व नागरिकांना बाहेर काढण्याची कार्यवाही करतील.

महाराष्ट्र राज्य नियंत्रण कक्षाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी एनडीआरएफचे आणखी एक पथक बचाव कार्यासाठी मिळवले असून ते पुढील दोन तासात माढा येथील बचाव कार्यात सहभाग घेणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

संपूर्ण सोलापूर जिल्हा प्रशासन तसेच तालुकास्तरीय प्रशासकीय यंत्रणा ही महापूराची परिस्थिती हाताळण्यासाठी रात्रंदिवस परिश्रम घेत आहेत. तरी नागरिकांनी जिल्हा नियंत्रण कक्षाच्या ०२१७/२७३१०१२ या क्रमांक वर संपर्क साधून अतिवृष्टी व पूर परिस्थितीच्या अनुषंगाने माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते ७१ वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मान मानल्या जाणाऱ्या ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे वितरण विज्ञान भवन येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते करण्यात आले. या मल्याळम सुपरस्टार मोहनलाल यांना 'दादासाहेब फाळके जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले .या सोहळ्यात मराठी चित्रपटांनी आपली गुणवत्ता आणि वैविध्य सिद्ध करत राष्ट्रीय पातळीवर आपली छाप पाडली. 'शामची आई', 'नाळ २' आणि 'जिप्सी' या चित्रपटांनी मराठी सिनेमाची श्रीमंती अधोरेखित करत विविध श्रेणींमध्ये पुरस्कार पटकावले. वर्ष २०२३ मधील उत्कृष्ट चित्रपट आणि कलाकारांना सन्मानित करण्यात आले.

या केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, , माहिती व प्रसारण विभागाचे सचिव संजय जाजू आणि निवड समितीचे सदस्य आशुतोष गोवारीकर, पी.शेषाद्री, गोपालकृष्ण पाय व्यासपीठावर उपस्थित होते. मल्याळम चित्रपटसृष्टीचे दिग्गज अभिनेते मोहनलाल यांना भारतीय चित्रपट क्षेत्रातील सर्वोच्च सन्मान, दादास- ाहेब फाळके पुरस्कार २०२३, ७१व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. चार दशकांहून अधिक काळ ४०० पेक्षा जास्त चित्रपटांमध्ये अभिनय, दिग्दर्शन आणि निर्मितीच्या माध्यमातून भारतीय सिनेमाला समृद्ध करणाऱ्या मोहनलाल यांच्या अप्रतिम योगदानाचा यानिमित्ताने गौरव झाला. म ल्याळमसह तेलुगू, तमिळ, कन्नड आणि हिंदी चित्रपटांमध्ये त्यांनी साकारलेल्या वैविध्यपूर्ण भूमिका आणि रंगभूमीवरील उत्कृष्ट कामगिरीने त्यांनी प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान मिळवले आहे. यापूर्वी २००१ मध्ये पद्मश्री आणि २०१९ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित मोहनलाल यांचा हा सन्मान त्यांच्या प्रेरणादायी कारकिर्दीतील आणखी एक सुवर्ण अध्याय आहे. त्यांचा हा वारसा भावी पिढ्यांना प्रेरणा देत रा- हील.

### प्रत्येक शासकीय यंत्रणांनी परस्परात समन्वय ठेवून पुरात अडकलेल्या नागरिकांना सुखरूप बाहेर काढावे

### अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानी संदर्भात आढावा बैठक

## जिल्ह्यात आपत्तीची परिस्थिती असून कोणत्याही शासकीय विभाग प्रमुखांनी मुख्यालय सोडू नये : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : जिल्ह्यात म ागील काही दिवसांपासून पाऊस अतिवृष्टी तसेच भीमा व सीना नदीला आलेल्या म हापुरामुळे माढा करमाळा मोहोळ पंढरपूर उत्तर सोलापूर दक्षिण सोलापूर या अनेक गावांमधील नागरिक पुराच्या पाण्यात अडकलेले आहेत. त्यांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी जिल्हा प्रशासन तालुकास्तरीय यंत्रणाच्या सहकार्यातून प्रयत्नशील आहे. तरी जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख तसेच तालुकास्तरीय यंत्रणा प्रमुखांनी मुख्यालय सोडू नये व या आपत्तीच्या परिस्थितीत दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थिती चा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा कृषी अधिक्षक शुक्राचार्य भोसले, महावितरणचे अधिक्षक अभियंता एस.एम. माने, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, अति. आयुक्त सो.म.पा. संदीप कारंजे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, कार्यकारी अभियंता सा.बां.जि.प. नरेंद्र खराडे यांच्यासह अन्य संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, जिल्ह्यात पूरग्रस्तांसाठी उभारण्यात आलेल्या निवारा केंद्रांमध्ये सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, ग्रामपंचायत, महसूल व महावितरण विभागातील प्रत्येकी दोन कर्मचारी १२-१२ तासांच्या शिफ्टमध्ये कार्यरत राहतील, असे त्यांनी आदेशित केले. तसेच कोणीही मुख्यालय सोडणार नाही याबाबत दक्षता घ्यावी असेही त्यांनी सांगितले.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने खाजगी ठेकेदारांशी समन्वय साधून आपत्कालीन परिस्थितीत सहकार्य करावे, आरोग्य विभागाने औषधांचा पुरवठा करून डॉक्टर, सिस्टर, आशा वर्कर व सफाई कर्मचारी नेमावेत, ग्रामपंचायत विभागाने स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, महावितरण विभागाने २४ तास लाईनमन नियुक्त करावा, इरिगेशन विभागाने संभाव्य पूरग्रस्त गावांची यादी सादर करावी, तर ग्रामीण पोलीस विभागाने दक्ष राहून इतर विभागांशी समन्वय साधावा, अशा स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या. या कामात हलगर्जीपणा केल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.



## संपादकीय....

### मुख्यमंत्र्यांकडून दिलासा

अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून राज्य सरकारने तातडीच्या मदतीसाठी यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत केली आहे. राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी असून घरे, शेती आणि जनावरांचे जिथे नुकसान झाले आहे तिथे आवश्यक त्या ठिकाणी निकषामध्ये शिथिलता आणून मदत केली जाईल, अशी माहिती नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा मंत्रिमंडळ बैठकीत आढावा घेण्यात आला होता. आतापर्यंत ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना २२१५ कोटी रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. यापैकी १८२९ कोटी रुपये जिल्हा स्तरावर वितरित करण्यात आले असून येत्या ८ ते १० दिवसात शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत जमा होईल. पूरग्रस्त भागांतील पंचनामे पूर्ण होताच तातडीने मदत पोहोचवली जात आहे. ज्या तालुक्यांचे पंचनामे पूर्ण होतात, तिथे त्वरित आर्थिक सहाय्य वितरित केले जाते. एकत्रित शासन आदेशाची वाट न पाहता, पंचनामे येतील तसे जीआर काढण्यात येत आहेत. मदतकार्य कुठेही थांबलेले नाही . मृत्यू, जनावरांचे नुकसान, घरांचे नुकसान यांसारख्या दुर्दैवी घटनांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने मदत वितरित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. स्थानिक पातळीवरही नुकसानग्रस्तांना त्वरित दिलासा देण्यासाठी प्रशासनाला पूर्ण सूट देण्यात आली असून, निधीची कमतरता भासणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली आहे. धाराशिव, अहिल्यानगर, जळगाव, सोलापूर, बीड, परभणी आदी जिल्ह्यांत गेल्या काही दिवसांत अतिवृष्टीमुळे शेती आणि घरांचे मोठे नुकसान झाले.

# स्वस्थ नारी म्हणजे सशक्त परिवाराची पायाभरणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**स्त्री म्हणून जगतांना खुप काही करावं लागतं**

**आयुष्य तिचे असते पण दुसऱ्यासाठी जगावं लागतं**

समाजाच्या आरोग्याचा व देशाच्या विकासाचा पाया म्हणजे स्त्रीचे आरोग्य. कारण नारी हीच एका परिवाराची, समाजाची आणि अखेर राष्ट्राची मूळ शक्ती आहे. स्त्री निरोगी असेल तरच घर आनंदी असते आणि घर आनंदी असेल तरच समाज सक्षम होतो. हा विचार आपण मान्य केला, तर 'स्वस्थ नारी – सशक्त परिवार' हे फक्त घोषवाक्य न राहता भारताची दिशा दाखविणारा विचार आहे व हाच विचार भविष्यातील प्रत्यक्ष आयुष्याचा मंत्र ठरेल. कारण स्त्री निरोगी असेल तर तिच्या मुलांचे आरोग्य चांगले राहते; घरातील इतर सदस्यांवरही तिचा सकारात्मक परिणाम होतो. परिवारातील प्रत्येक सदस्याचे आरोग्य हे आईच्या आरोग्यावर अवलंबून असते. जर आई निरोगी असेल तर तिचे मूलही निरोगी वाढते. स्त्रीच्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता तिला नियमित वैद्यकीय तपासणी, मानसिक शांती आणि कुटुंबाकडून आधार मिळाले तर संपूर्ण कुटुंब सक्षम, निरोगी आणि आनंदी राहते. म्हणूनच स्वस्थ नारी हीच सशक्त परिवाराची खरी गुरुकिल्ली आहे. सामाजिक पातळीवर मानसिकता बदलणे, महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

आज स्त्रिया शिक्षण, उद्योग, नोकरी, राजकारण या क्षेत्रांत झेपावत असल्या तरी त्यांच्या आरोग्याकडे अजूनही दुर्लक्ष केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारतातील निम्म्याहून अधिक स्त्रिया रक्ताल्पतेने ग्रस्त आहेत. प्रसूतीदरम्यान योग्य वैद्यकीय सेवा न मिळाल्याने मातामृत्यू दरही चिंताजनक आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांमध्ये रक्ताल्पता, कुपोषण, प्रसूतीसंबंधी आजार अजूनही चिंतेचा विषय आहेत. शहरी भागात मात्र मधुमेह, स्थूलता, हृदयविकार यांसारखे जीवनशैलीशी निगडीत आजार वाढत आहेत. घरातील जबाबदाऱ्या, नोकरीतील ताण, समाजाच्या अपेक्षा या सगळ्यामुळे स्त्रीच्या आरोग्याकडे सर्वात शेवटी लक्ष दिले जाते. पण आकडेवारीच्या पलीकडे एक वेगळीच गोष्ट आहे. घरातील स्त्री जर आजारी पडली, तर घरातील वातावरणच बदलून जाते. मुलांच्या चेहऱ्यावरचे हसू हरवते, वृद्धांना आधार उरत नाही आणि पुरुष अस्वस्थ होतो. कारण नारी ही घराचे हृदय आहे. तिच्या हसण्यात कुटुंबाचे सौख्य दडलेले असते, तर तिच्या थकलेल्या नजरेत घराचे दुःख उमटते.

आज सरकार विविध आरोग्य योजना राबवत आहे, जसे प्रसूतीसाठी मोफत वैद्यकीय सेवा, पोषण आहार योजना, महिलांसाठी योग शिबिरे, स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छतागृह सुविधा पण केवळ सरकारी पातळीवर काम करून चालणार नाही. प्रत्येक परिवाराने, समाजाने, कुटुंबाने जागरूक होणे गरजेचे आहे. तसेच, आजच्या आधुनिक समाजात महिला शिक्षण, रोजगार, राजकारण, उद्योग या क्षेत्रात वेगाने प्रगती करत असल्या तरी आरोग्याच्या बाबतीत अजूनही मोठ्या अडचणी दिसून येतात. घरातील प्रत्येकाने हे लक्षात ठेवावे की, मुलींच्या आहाराची काळजी घेणे, किशोरवयीन मुलींना योग्य आरोग्य व स्वच्छतेचे शिक्षण देणे, स्त्रियांना नियमित आरोग्य तपासणीस प्रवृत्त करणे, घरकामात पुरुषांनी समतोल सहभाग वाढवणे आणि मानसिक आरोग्याबद्दल मोकळेपणाने संवाद साधने. या बाबी महिला आरोग्यासाठी महत्त्वाच्या ठरतात आणि या गोष्टींचा अवलंब झाला तरच 'स्वस्थ नारी–सशक्त परिवार' हा विचार प्रत्यक्षात उतरू शकेल. त्यासाठी कटिबध्द राहणे गरजेचे आहे, तेव्हाच हे शक्य होईल.



आज आपल्याला हे मान्य करावे लागेल की स्त्री ही फक्त घर चालवणारी नाही, तीच घर घडवणारी आहे. तिचे आरोग्य बळकट असेल तर कुटुंब आनंदी राहील आणि आनंदी कुटुंबातूनच सक्षम राष्ट्र उभे राहते. स्त्री निरोगी असेल तरच कुटुंब सशक्त होईल आणि राष्ट्र अधिक प्रगत होईल. म्हणूनच, प्रत्येकाने आपल्यापासून सुरुवात करून स्त्रीच्या आरोग्याचे आणि सन्मानाचे रक्षण करणे हिच आजची खरी सामाजिक जबाबदारी आहे. शेवटी, निरोगी स्त्री, निरोगी पिढी, आनंदी घर म्हणजे सशक्त समाज आणि सशक्त समाज म्हणजे सक्षम राष्ट्र.

स्त्री पुरुष दोघंही समान आहेत आणि सुख मिळविण्यासाठी धडपडणं हा दोघांचाही अधिकार आहे. फक्त पुरुषांना आयुष्यभर सुखात राहावं आणि दु:खाची विभागणी संपली पाहिजे. माणूस या नात्यानं पुरुषाला मिळतं ते जन्मसिध्द स्वातंत्र्य स्त्रीलाही मिळालं पाहिजे. ही स्त्री भूतकाळाशी जोडलेली असते, भावूक आणि हळवी असते. कुटुंबाचा सांभाळ करते, स्वत:ला निराधार वाटत असतांनाही कुटुंबाला आधार देते, पती, मुलगी, मुलगा यांच्यावर प्रेम करते. कधी त्यांचा दुरावा जाणवल्यावर येणारी विफलताही अनुभवते, ती व्यवसायात ही कर्तव्यदक्ष असते. एकंदरीत तिचा सहभाग महत्वाचा हे विसरुन चालणार नाही. चूल आणि मूल मध्ये गुरुफटलेल्या, चालीरितीच्या कुंपणात वावरणाऱ्या स्त्रीला समाजभय संकोच यामध्ये पार दडपून टाकलेलं, पण काळाच्या ओघात परिवर्तनाशिवाय पर्याय नाही. या सबबीनंतर तिने टोकाचे पाऊल उचलून भरारी घेण्याचं ठरवलं. कुटुंबाबरोबरच समाजाच्या उभारणीतही मोलाची भूमीका बजावत आहे, अशा या सशक्त नारीला मानाचा मुजरा !

## उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे राष्ट्रीय आयुर्वेद दिवस साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय नाशिक यांच्या आदेशानुसार तसेच निफाड उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ राजीव तांभाळे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत राष्ट्रीय आयुर्वेद दिवस. उपजिल्हा रुग्णालय, निफाड येथे साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन उपजिल्हा रुग्णालय निफाड तसेच डॉ संकेत आहेर,आयुष विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या वेळी डॉ संकेत आहेर यांनी उपस्थिताना आयुर्वेद पद्धतीचे दैनंदिन जीवनातील महत्व अधोरेखित केले. योग्य आहार–विहार, औषधी वनस्पतींचा उपयोग, तसेच आरोग्य राखण्यासाठी आयुर्वेदातील तत्त्वांचा अवलंब याविषयी माहिती देण्यात आली.

तसेच विविध आजारांवर आयुर्वेदीय उपचार पद्धती व प्रतिबंधात्मक उपाय याबाबत मार्गदर्शन केले. नागरिकांना मोफत तपासणी व सल्ला सेवा देखील उपलब्ध करून देण्यात आली.या कार्यक्रमास उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील सर्व वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहून लाभ घेण्यात आला.

## मृत्यू झाल्यास प्रेताचा अंत्यविधी ग्रा.पं. मध्ये करून लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

चिखली तालुक्यात बौद्ध समाजात स्मशान भूमी संदर्भात अनेक गावात अडचणी दिसून येत आहे गेल्या काही दिवसापूर्वी पाऊस सुरु असताना खंडाळा म.येथील बौद्ध व्यक्तीला दहन देण्यासाठी स्मशान भूमी नसल्यामुळे अडचण निर्माण झाली होती त्या पाठोपाठच काही दिवस उलटत नाही तर चिखली पासून काही अंतरावर असलेले



मौजे वाघापूर येथिल बौद्ध बंधू भगिनी यांनी तहसील कार्यालय चिखली यांना मौजे वाघापुर येथे गट नं. ५४ एफ क्लास मध्ये बौद्ध समाज हा उघड्यावर अंत्यविधी करीत आहे. सदर एफ क्लास मध्ये बौद्ध समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी बाधून दिल्यास प्रेताची विटंबना होणार नाही, जर पावसाळ्यामध्ये मृत्यु झाल्यास प्रेताची विटंबना होऊ शकते,दहन करण्यासाठी स्मशानभूमी नाही सदर स्मशान भुमीचे वेळोवेळी ग्रामपंचायने ठराव दिले, परंतु त्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही. तरी बौद्ध समाजासाठी स्वतंत्र जागा आरक्षित करून त्यावर स्मशानभुमी बांधून देण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी. तसेच स्मशान भुमीची स्वतंत्र ७/१२ मध्ये ०.२० आर जमिनीची नोंद करून देण्यात यावी.

सदर मागणी मान्य न झाल्यास व वरील मागणीची पुर्तता न झाल्यास ठराविक वेळेनंतर बौद्ध समाज बांधव बौद्ध समाजात मृत्यु झाल्यास प्रेताचा अंत्यविधी ग्रा.पं. कार्यालयात करेल तसेच सर्व बौद्ध बांधव हे स्मशानभुमीच्या खुल्या जागेत जावून लोकशाही मार्गाने आंदोलन करतील तरी सदरील बाब हि अत्यंत तापदायक व कुणाला त्रासदायक होऊ नये याचा विचार करून स्मशानभूमीचे बांधकाम करून देणे व स्वतंत्र बौद्ध स्मशानभुमी म्हणून गट नं. ५४ एफ क्लास मध्ये नोंद करून देने हि निवेदनात विनंती समज बांधवानी केलेली आहे तसेच पुढील होणाऱ्या परीणामास शासन व प्रशासन जबाबदार राहिल असा इशारा सुद्धा देण्यात आला आहे आहे. यावेळी तह यांना निवेदन देताना वंचित तालुका अध्यक्ष संजय धुरंधर शहर अध्यक्ष बाळू भिसे सचिव जितु निकाळजे गुलाबराव साळवे संजय भिसे दिपक साळवे समाधान साळवे राहुल साळवे दुर्गाबाई इंगळे संपत वाघ विवेक साळवे इ सह समजतील अनेक जण उपस्थित होते.

## मोगरगा गावात अतिवृष्टीने अनेक घरांची पडझड शेतीतील पिकांचे नुकसान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव

औसा तालुक्यातील मोगरगा येथे अतिवृष्टीने अनेक घराची पडझड झाली असुन शेतातील हातातोंडाशी आलेले सोयाबिन सह पिके गुडघाबर पाण्यात असुन .ओढे नाले वाहत असल्याने शेतकर्यात भितीचे वातावरण असुन काल झालेल्या ढगफुटी सद्रश्य पावसाने ओढा फुटुन आजुबाजुच्या शैतकर्यांची शैती खरडुन गेल्याने शेतकरी टाहो फोडुन आक्रोश करत आहेत ,मोगरगा शिवारातील अनेक शेतकर्यांची सोयाबीन तुर .उस .उडीद मुग पीके जमिनीवर आडवी पडल्याने शेतकर्यांना अर्थीक नुकसानीला सामोरे जाव लागत आहे .संततधार पावसात सरपंच रवि निकम यांनी प्रशासनाला कळवताच औसा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी .ग्रामसेवक .तलाटी सह कृषी सहायक यांनी पिक व पडझड झालेल्या घराचे पंचनामे करण्यात आले आहेत .यावेळी गावातील अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने संसारउपयोगी साहित्य पाण्यात असल्याने ग्रामस्थांनी रात्र जागुन काडल्याच चित्र आहे. यावेळी गजराबाई केशव सूर्यवंशी, केशरबाई बसुळे यांच्या घराची पडझड झाली तर शेतकरी संतोष शिवाजी निकम अरविंद किसन निकम यांची अतिवृष्टीने जमीन खरडुन गेली आहे. लवकरात लवकर सरकारी मदत मीळावी अशी शेतकरी मागणी करतोय.

## 'सर्वंकष लैंगिकता शिक्षण कार्यक्रमामुळे सक्षम पिढी निर्माण होते : वीरेंद्र परदेशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) : विज्ञानवादी युगात किशोरवयीन मुले–मुली व युवा पिढी मोबाईलच्या आहारी जाऊन अनेक वाईट गोष्टींना बळी पडत आहेत. ए. आय. सारख्या नव–नवीन पमुळे विकृती वाढत आहे. अशा पचे परिणाम जेवढे चांगले आहेत, तेवढेच वाईट देखील आहेत. यातून नकळत मुलांच्या हातून सायबर गुन्हे घडत आहेत. मुलांना मोबाईल पासून दूर ठेवणे शक्य नसले तरी मोबाईलच्या अतिरेक वापरावर अंकुश ठेवता येतो. मुलांना सर्वंकष लैंगिकता शिक्षण कार्यक्रमात समाविष्ट करून योग्य शिक्षण दिल्यास सक्षम पिढी निर्माण होऊ शकते असे प्रतिपादन फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी यांनी केले.





ते प्रिसिजन फाउंडेशन व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने पीएमश्री. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, एम. आय. डी. सी. चिंचोलीकाटी येथे आयोजित दोन दिवसीय 'सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण शिबिरात मुख्य प्रवर्तक म्हणून बोलत होते.

या उपक्रमात शाळेचे मुख्याध्यापक हबीब नवाज पाटील, मनोज ठोंबरे, राजन ढवण, शशिकला कुंभार, गीता म्हेत्रे, दीपक गावडे, बापूराव येजगार, पवित्रा मदने आदी शिक्षक उपस्थित होते.

या शिबिरात इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांना किशोरावस्था, वैयक्तिक व पर्यावरण स्वच्छता, सकस व संतुलित आहार, एचआयव्ही/एड्स, मासिक पाळी काळजी, कॅन्सर, गुड टच–बॅड टच, बाललैंगिक शोषण प्रतिबंध आदी विषयांवर स्वप्निल सोनवणे, सत्यभामा कांबळे, उर्मिला बनसोडे, विकी शिवशरण पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन च्या साह्याने विद्यार्थ्यांना शास्त्रोक्त माहिती दिली तर चाईल्ड लाईन १०९८ या विषयावर अनोज कदम यांनी माहिती देत मुलांना सुरक्षिततेचे भान करून दिले. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांसाठी एचआयव्ही/ एड्स हा विषय सोपा करून सांगण्यासाठी सापशिडीचा खेळ, प्रश्नोत्तर सत्र यांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या शंकांचे निरसन केले. शेवटच्या सत्रात विद्यार्थ्यांची व शिक्षकांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली.


या शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता, आत्मविश्वास व सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला असून, हा उपक्रम भविष्यासाठी मार्गदर्शक ठरेल असा विश्वास प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे, सहायक जनसंपर्क अधिकारी वैशाली बनसोडे यांनी व्यक्त केले.


## प्रथम वर्ष बी.फार्मसी आणि एम.फार्मसी प्रवेशासाठी कॅप राऊंड–१ चे ऑप्शन्स भरण्याची प्रक्रिया सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी प्रथम वर्ष बी.फार्मसी आणि एम.फार्मसी प्रवेशाची पहिली फेरी (फर्स्ट कॅप राऊंड)चे ऑप्शन फॉर्म भरण्याची प्रक्रिया गुरुवार, दि. २५ सप्टेंबर २०२५ पासून ते शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०२५ पर्यंत म्हणजेच एकूण तीन दिवस चालणार आहे. या कालावधीत स्वेरी फार्मसीच्या स्क्रूटिनी सेंटर (एस.सी. क्रमांक ६३९७) मध्ये ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची सोय करण्यात आली आहे. या पहिल्या प्रवेश फेरीची अलॉटमेंट यादी अधिकृत संकेतस्थळावर गुरुवार, दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होणार आहे. ज्यांनी पदवी आणि पदव्युत्तर फार्मसी प्रवेशासाठी कॅप रजिस्ट्रेशन, डॉक्युमेंट्स व्हेरिफिकेशन आणि कन्फर्मेशन केले आहे त्यांना या प्रवेश फेरीचा लाभ घेता येईल', अशी माहीती संस्थेचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये पदवी आणि पदव्युत्तर फार्मसी प्रवेशाकरीता दि. ०७ जुलै २०२५ ते दि. ०२ सप्टेंबर २०२५ या कालावधी दरम्यान ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, भरलेले अर्ज स्विकारुन कागदपत्रांची तपासणी, पडताळणी व निश्चिती करणे आदी प्रक्रिया पूर्ण झाल्या असून तात्पुरती गुणवत्ता यादी दि.०६ सप्टेंबर २०२५ रोजी शासनाच्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाली. त्यानंतर पहिली फेरी (फर्स्ट कॅप राऊंड) चे ऑप्शन फॉर्म भरण्याची प्रक्रिया गुरुवार, दि. २५ सप्टेंबर २०२५ पासून ते शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०२५ या दरम्यान होणार आहे.





या पहिल्या फेरीमध्ये योग्य आणि पसंतीच्या महाविद्यालयाचे पसंतीक्रम ऑनलाईन भरावे लागणार आहेत. यासाठी विद्यार्थी व पालकांनी पूर्णपणे अभ्यास करून कॅप राऊंड–१ चे ऑप्शन फॉर्म भरणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालय निवडताना महाविद्यालयात दरवर्षी होणारे प्रवेश, विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल, कॅम्पस प्लेसमेंटची संख्या, वसतिगृह सुविधा, इतर सोयी–सुविधा, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग, संशोधने, मानांकने या महत्वाच्या बाबींचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यास करून करिअरच्या दृष्टीने योग्य महाविद्यालयाची निवड करणे अत्यंत गरजेचे आहे. डॉ. बी.पी. रोंगे यांच्या नेतृत्वाखाली स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीची स्थापना २००६ साली झाली. तेंव्हापासून ते आजपर्यंत हे महाविद्यालय यशाच्या पायऱ्या पादाक्रांत करत आहे. सोलापूर आणि आसपासच्या परिसरात फार्मसी महाविद्यालयांची संख्या वाढताना दिसत आहे परंतु सोलापूर जिल्ह्यातील फार्मसी क्षेत्रातील नामांकित असणारे कॉलेज म्हणजे स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर हे होय. स्वेरीमध्ये असणारी आदरयुक्त शिस्त तसेच ट्रिपलपीई सिस्टिम, निकाल, उच्चशिक्षित प्राध्यापक, प्रशस्त इमारत, भव्य क्रीडांगण, प्लेसमेंट ह्या कॉलेज निवडताना विचारात घेतल्या जाणाऱ्या गोष्टी या स्वेरीच्या उल्लेखनीय बाजू आहेत. त्यामुळे स्वेरीवर पालकांचा विश्वास आणखी दृढ होताना दिसत आहे. पहिल्या प्रवेश फेरीचे जागावाटप (अलॉटमेंट) दि.२९ सप्टेंबर रोजी प्रदर्शित केले जाणार आहे. पहिल्या फेरीच्या जागावाटपानंतर विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन मंगळवार, दि.३० सप्टेंबर ते शुक्रवार, दि. ०३ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरून प्रवेशाची निश्चिती करावी लागणार आहे. प्रथम वर्ष बी. फार्मसी आणि एम. फार्मसी प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार तसेच प्रा. हेमंत बनसोडे (८८३०९८७३७८) व डॉ. वृणाल मोरे (९६६५१९६६६६), यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. स्वेरीचे संस्थापक डॉ.बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ. मिथुन मनियार यांच्या नेतृत्वाखाली फार्मसीला सातत्याने मिळत असलेल्या अभूतपूर्व यशाच्या पार्श्वभूमीवर या पहिल्या फेरीला विक्रमी गर्दी होण्याची चिन्हे दिसत आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सोलापुरात जिल्ह्यात अतिवृष्टी; पुराच्या पाण्यात अडकले रिधोरे गावकरी



## पूरग्रस्तांना तातडीने सुरक्षित स्थळी हळविण्यात यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राला मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात पूर आला आहे. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात पूरस्थिती चिंताजनक आहे. अक्कलकोट तहसील कार्यालयाचे आपदा पथक तैनात झाले असून, माढा तालुक्यातील रिधोरे गावातील पूरग्रस्तांना तातडीने सुरक्षित स्थळी हळविण्यात आले असून, शेती आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे.

**अक्कलकोट तहसील आपदा पथक घटनास्थळी दाखल**

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना मुसळधार पाऊस आणि अतिवृष्टीने झोडपून काढले आहे. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस कोसळत आहे. यामुळे सर्वत्र पूर आला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. या ठिकाणी नद्यांना आलेल्या पुरामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. तर अनेक गावांमध्ये पाणी शिरले आहे. सध्या प्रशासनाकडून मदत आणि बचावकार्य वेगाने सुरु आहे. राज्यातील पूर आलेल्या अनेक ठिकाणी अडकलेल्या लोकांना अक्कलकोट तहसील कार्यालय आपदा पथक यांच्या मदतीने तातडीने मदत केले जात असल्याचे चित्र सध्या जिल्ह्यात पाहवयास मिळत आहे.

सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नद्यांना पूर जिल्ह्याला गेल्या दहा दिवसांपासून मुसळधार पावसाने झोडपले आहे. यामुळे जिल्ह्यातील सर्व नद्या आणि धरणे ओव्हरफ्लो झाली आहेत. रात्री झालेल्या पावसामुळे सिना कोळेगाव धारणाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस चालू असल्याने सिना कोळेगाव धरणातून आज दिनांक दि :- २३/०९/२०२५ रोजी एकूण ६१००० क्युसेकने सुरू असलेला विसर्ग आज पहाटे ५:३० वाजता वाढ करून * ६५५०० क्युसेक एवढा करण्यात आला आहे.

सिना नदीच्या दोन्ही तिरावरील शेतकरी, नागरिक या सर्वांनी याबाबत सावधानता बाळगावी.पाण्याची आवक व पावसाचे प्रमाण लक्षात घेता नदीपात्रातील विसर्गात वाढ/कमी होण्याची शक्यता आहे. असे आव्हान जिल्हा व तालुका महसूल प्रशासना च्या माध्यमातून करण्यात असून, धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. ज्यामुळे रिधोरे गावात नदीकाठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच माढा तालुक्यातील रिधोरे गावात नदीच्या पुरात ३६ लोक अडकल्याची माहिती समोर आली होती. ही माहिती मिळताच रात्री अक्कलकोट येथून तहसील कार्यालयाचे पथक दाखल झाले. या पथकाने केलेल्या बचावकार्यात २८ लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले असून, ८ जणांना सुरक्षित स्थळी स्थलांतरीत केले असून, उर्वरित लोकांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

या आपदा पथक अक्कलकोट चे तहसीलदार विनायक मगर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आपदा मित्र प्रविणकुमार बाबर, जाकीर कागदे, गोपीनाथ माने, रामचंद्र माने, हनुमंत सानप यांचा समावेश असून, आज पहाटे पासून, आतापर्यंत ४० लोकांना सुरक्षित स्थळी हळविण्यात यश आले आहे.

## पूर परस्थिती : मंदिर समितीकडून पुरग्रस्त नागरिकांना फुड पॅकेट व लाडूप्रसादाचे वाटप

**मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या आवाहनानुसार मंदिर समिती मार्फत जिल्हा प्रशासनास आवश्यक ती मदत करण्याचा निर्णय**



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

: राज्यामध्ये सर्वत्र पुरस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे नदीच्या पाणी पातळीत वाढ झालेली आहे. प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी राज्यातील सर्व देवस्थानांना पुरग्रस्त नागरिकांना आवश्यक ती मदत करावी असे आवाहन केले आहे. त्यास प्रतिसाद म्हणून तसेच मानवतावादी भूमिकेतून व सामाजिक उत्तरदायित्व म्हणून मंदिर समितीकडून पुरग्रस्त नागरिकांना फुड पॅकेट व लाडूप्रसादाचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

**मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर**

सद्यस्थितीत, पंढरपूर शहर व परिसरात देखील पूरस्थिती निर्माण झाली आहे. त्याबाबत जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. मंदिर समिती प्रत्येकवेळी पंढरपूर शहरातील स्थानिक पुरग्रस्त नागरिकांना फुड पॅकेट वाटप करीत असते. ह्यावेळी जिल्हा प्रशासनास देखील आवश्यक ती मदत करण्याचा मंदिर समितीने निर्णय घेतला असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

# सांगोला विधानसभा मतदारसंघात ओला दुष्काळ जाहीर करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला विधानसभा मतदारसंघात सतत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. ओल्या दुष्काळाची स्थिती निर्माण झाल्याने शेतकरी संकटात सापडले असताना, सांगोला मतदारसंघातील आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी आज मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली तसेच महिम, आलेगाव, जवळा आणि आगलावे वाडी या गावांतील मृतांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति एकर १ लाख रुपयांची तात्काळ मदत देण्याची आग्रही मागणी केली. या मागणीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सकारात्मकता दाखवत लवकरात लवकर मदत जाहीर करण्याचे आश्वासन दिले.

ऑगस्ट महिन्यापासून सतत पडत असलेल्या पावसामुळे शेतजमिनींमध्ये



पाणी साचले असून, पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

विशेषत:महिम,आलेगाव,कडलास,महूद,सोनंद,वाटंबरे, अकोला,जवळा आणि आगलावे वाडी या गावांमध्ये पावसाच्या तीव्रतेमुळे अनेक शेतकऱ्यांच्या घरांना आणि शेतांना धक्का बसला आहे. तसेच शेतकऱ्यांच्या मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले आहे.

आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सांगोला तालुक्यातील परिस्थिती सांगताना, ओल्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे जीवन

**आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी**

उद्ध्वस्त झाले आहे. शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून ओला दुष्काळ जाहीर करावा, अन्यथा शेतकरी आणखी संकटात सापडतील. त्याचबरोबर, मृतांना १० लाख रुपयांची मदत आणि प्रति एकर १ लाख रुपयांची भरपाई देण्याची मागणी त्यांनी पुन्हा पुन्हा अधोरेखित केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देताना म्हटले की, सांगोला मतदारसंघातील सद्यपरिस्थितीची तात्काळ चौकशी करून मदत केली जाईल असे सांगितले.

आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून मदतीची मागणी केल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

# लामजना येथे अतिवष्टीने सोयाबिन गुडघाभर पाण्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
औसा प्रतिनिधी/अमर जाधव

औसा तालुक्यातील लामजना सह परीसरातील शेतकर्यांच्या शैतातील सोयाबिन सह पिके गुडघाभर पाण्यात असल्याने शेतकरी हतबल झाला असुन .गेल्या चार महिन्यापासुन सततच्या पावसाने शेतकर्यांच सोयाबिन सह तुर .उडीद पिकात गुडघाभर पाणी असुन सोयाबिन पीक पाण्यात गेल्याने शेतकरी हवालदिल झाला असुन आपल्या पिकाचे पंचनामे व्हावे व तातडीची सरकारी मदत व्हावी अशी मागणी शैतकरी करत आहेत.



यावेळी सैलानी मिर्झा.दुल्लेसाब लाडखॉ.अयुब शेख.एहमद शेख, यासीन मुल्ला, कलीम लाडखॉ, रफीक लाडखॉ.हमीद शेख, वाजीद शेख, फतरु लाडखॉ, बालाजी पाटील, जयसिंग ठाकुर, भारतबाई सुरवसे, खॉजाभाई अजमेरी, याकुब मिर्झा सह शेतकरी यावेळी उपस्थित होते.



# सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीचा कहर; शेतकऱ्यांचे मोठे नुकसान; नागेश फाटे यांची बांधावर भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक गावांमध्ये पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.

पंढरपूर तालुक्यातील गादेगाव, खर्डी, कोर्टी, टाकळी,तनाळी, तपकिरी शेटफळ, तावशी, उंबरगाव, बोहाळी या गावांमध्ये शेतीमध्ये पाणी शिरून शेतमालाचे प्रचंड नुकसान झाले आहे.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उद्योग व व्यापारी विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी पाहणी केली.

याप्रसंगी सिद्धनाथ सिताराम काळे, मधुकर सिताराम काळे यांच्या गादेगाव येथील डाळींब बागेची पाहणी केली.

या अनपेक्षित संकटामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून, बळीराजा हवालदिल झाला आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते नागेश फाटे यांनी शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि नुकसानीचा आढावा घेतला. त्यांनी शेतकऱ्यांचे सांत्वन करत, प्रशासनाकडे तातडीने पंचनामे करून मदतीची कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी माध्यमांशी बोलताना नागेश फाटे यांनी स्पष्ट केले की, शरद पवार, जयंत पाटील आणि प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या या संकटावर ठोस उपाययोजना करण्यासाठी पक्षाकडून प्रयत्न सुरू आहेत. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर तातडीने आणि प्रभावी निर्णय घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

या भागातील शेतकरी सध्या मोठ्या संकटाला सामोरे जात असून, शासनाने त्वरित हस्तक्षेप करून आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी राष्ट्रवादीचे नेते नागेश फाटे यांनी केली आहे.

**१३३ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न**

**बी. बी. मेश्राम यांचे प्रतिपादन**

# आदर्श महापुरुषांच्या विचारांची मशागत केली तर आदर्श समाज तयार होईल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, नालंदा बुद्ध विहार समिति व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने, नालंदा बुद्ध विहार, संघर्ष नगर, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे आपल्या धार्मिक, सामाजिक व राजकीय आयुष्याचा पाया बुद्धिवाद हाच असला पाहिजे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ८१ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील प्रासंगिक विषयावर १३३ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा २१ सप्टेंबर २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, धार्मिक क्षेत्रात प्रगती करायची असेल तर धम्माचे आचरण केले पाहिजे. बुद्धिस्ट रिलिजियस सेमिनरी प्रमाणे चर्चा करून सामान्य जनतेला मानवतावादाकडे वळविले पाहिजे. सामाजिक दृष्ट्या विचार करता देशात भारताचे संविधानानुसार समाज तयार करण्यासाठी सर्व नागरिकांना भारताचे संविधान समजावून सांगण्यासाठी जनजागृती अभियान राबविले पाहिजे. परिणामी सारा भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न साकार करता येईल. तसेच



राजकीय दृष्ट्या विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षेप्रमाणे शासनकर्ती जमात व्हायचे असेल तर जनतेचे जनमत तयार करण्यासाठी ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू पॉलिटिक्स चालविले पाहिजे जेणेकरून प्रशिक्षित कार्यकर्त्यांची फळी निर्माण होईल. ज्यांच्यामार्फत समाज जीवनात विचारधारेचा प्रचार व प्रसार केला जाऊ शकेल. करिता या आठवड्यात बौद्धाचार्याचे जनक भैय्यासाहेब यशवंतराव आंबेडकर व राष्ट्रसंत नारायण गुरु यांच्या स्मृतिदिनानिमित्त आणि कॉम्रेड शरद पाटील व पेरियार ई. व्ही. रामासामी नायकर यांच्या जयंतीनिमित्त आदर्श महापुरुषांच्या विचारांची मशागत केली पाहिजे. म्हणजे आदर्श समाज तयार होईल. परिणामी परिवर्तनवादी आंदोलनाला वेगाने गतिमान करता येईल.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना सविता अभ्यंकर म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलासाठी मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता, हे महिलांनी लक्ष्यात घेतले पाहिजे. राजकीय दृष्ट्या विचार करतात निवडणूक प्रक्रियेत आपण कुठे आहोत? धार्मिक दृष्ट्या विचार करता फार कमी विहारे सक्रिय आहेत. त्यात तरुणांचा सहभाग नसल्यासारखा असतो.

याप्रसंगी विश्राम राऊत म्हणाले की, बुद्ध फुले शाहू आंबेडकरांचे विचार हे त्रिकालबाधित सत्य आहे. ते स्वीकारण्यासाठी बुद्धीवाद वापरला नाही तर आपण लयास जाणार आहोत.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर नालंदा बुद्ध विहाराच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. भंते कुलिनपुत्र वेस्सभुज्जी थेरो यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके व प्रास्ताविक दिलीप गझहंस यांनी केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, ॲड. विलास रामटेके, , उद्योजक शशिकांत काळे, विश्वनाथ इंगळे, गौतम धनेधर, इंजि. किशोर पाटील, रामदास अभ्यंकर, गंगाराम बोर्डे, प्रकाश सदाफुले, शेषराव हनुमंते, विश्राम राऊत, डी. एल. मोकळे, किसन मोरे, द्वारका गजहंस, मालती दंदे, लताबाई बोर्डे, मायाबाई राऊत, कलावती भालेराव, इंदुबाई बागुल, भाग्रताबाई गायकवाड, कमल हनुमंते, छाया मोकळे, सुमन नहिवळे, विश्वनाथ जाधव, रामराव सूर्यतळे, एम. बी. साळवे, किसन गणराज, अण्णाराव जाधव, दिलीप गजहंस, ज्ञानेश्वर खंदारे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

# पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघासह सोलापूर जिल्हा ओला दुष्काळग्रस्त जाहीर करून येथील शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत द्यावी

## आ.समाधान आवताडे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे समक्ष भेटून निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा/तालुका प्रतिनिधी :

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघासह सोलापूर जिल्हा ओला दुष्काळग्रस्त जाहीर करून येथील शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत देण्याची मागणी आ.समाधान आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यकडे समक्ष भेटून निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी आ. आवताडे यांनी दिनांक २२ रोजी दिवसभर पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील अनेक अतिवृष्टी झालेल्या गावांना भेटी देत शेतकऱ्यांच्या



बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या तसेच शेतकऱ्यांना सरकार निश्चित मदत करेल असा शब्द देऊन रात्री उशिरा मुंबईकडे प्रयाण करीत आज दिनाक २३ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेत शेतकऱ्यांच्या व्यथा व समस्या मांडल्या. यावेळी त्यांनी पंढरपूर- मंगळवेढा विधानसभा मतदार संघासह सर्व सोलापूर जिल्ह्यामध्ये मागील काही दिवसांपासून सतत मुसळधार पाऊस कोसळत आहे. सध्या आतापर्यंत एकूण सरासरीच्या प्रमाणात १४५% इतका पाऊस पंढरपूर-मंगळवेढा विधनासभा मतदार संघात पडला असून काही ठिकाणी अतिवृष्टी तर काही ठिकाणी सतत संततधार पाऊस पडत असल्यामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले असून ज्वारीचे कोठार समजले जाणाऱ्या मंगळवेढा शिवारामध्ये २ फुट पाणी साचले असून बऱ्याच भागातील माती वाहून गेलेली आहे. अधिकाऱ्यांना पिकांचे पंचनामे करणेसाठी शेतामध्ये जाणे मुश्कील झाल्यामुळे पंचनामे करण्यासाठी अधिकाऱ्यांना आणखी कांही दिवस मुदतवाढ देण्यात यावी.

अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आलेले आहेत शेतकऱ्यांनी प्रसंगी कर्ज काढून खरीप हंगामातील पिके जोपासली आहेत. तसेच मतदार संघामध्ये मंगळवेढा तालुक्यातील ढवळस येथे अतिवृष्टीमुळे भिंत कोसळून योगीराज हेंबाडे या ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला असून त्याची बहीण जागृती हेंबाडे हिच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आतापर्यंत जवळपास ३५ जनावरे मयत झाली असून, १०० घरांची पडझड झालेली आहे. सामान्य शेतकरी, शेतमजुर, पशुपालक शेतकरी, निसर्गाच्या या रुद्र अवतारामुळे भयभित झाला आहे. पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघासह सर्व सोलापूर जिल्ह्यामध्ये अशीच परिस्थिती आहे. तर काही ठिकाणी यापेक्षाही भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघासह सर्व सोलापूर जिल्हा ओला दुष्काळग्रस्त जाहीर करुन सर्व शेतक-यांना सरसकट नुकसान भरपाई देण्यात यावी. पुराच्या पाण्यामुळे प्रभावित झालेल्या कुटुंबांना आणि जिवीतहानी झालेल्या ठिकाणी तात्काळ आर्थिक मदत करण्याच्या सुचना देण्यात याव्यात, तसेच येथील परिस्थिती पाहता पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघासह जिल्हा ओला दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करावा व त्या अनुषंगाने येथील नागरिकांना मदत देण्यात यावी अशी मागणी त्यांनी यावेळी केली यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक निर्णय लवकरच घेऊ असे सांगितले. तसेच यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन त्यांना मंगळवेढा पंढरपूर मतदार संघातील स्थितीची माहिती देऊन मदतीची मागणी देखील आ. आवताडे यांनी केली आहे.

तसेच ज्या ठिकाणी पर्जन्यमापक केंद्र आहेत त्या केंद्रावरती पडलेला पाऊस व्यवस्थित रित्या मोजला जात नाही त्यामुळे असे लक्षात आल्यानंतर स्कायमेट चे अधिकारी आणि जिल्हाधिकारी सोलापूर यांना सदरची पर्जन्यमापक यंत्र दुरुस्ती करून महसूल आणि कृषी यांची पर्जन्यमापक केंद्राचा आधार घेऊन मागील काही दिवसात पडलेला पावसाची आकडेवारी रिवाईज करून पंचनामा करणे संदर्भात सूचना दिल्या.

# पंढरपुरात रस्त्यावरच्या खड्ड्यात पेटवल्या मेणबत्त्या, महर्षी वाल्मिकी संघाचे अनोखे आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी): पंढरपूर शहरातील विविध भागातील चौकाचौकात, विविध मार्गांवर सध्या प्रचंड प्रमाणात खड्डे पडल्यामुळे नागरिक व भाविकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतोय. याचाच निषेध म्हणून पंढरपुरातील महर्षी वाल्मिकी संघाचे वतीने रस्त्यांवरील खड्ड्यात मेणबत्त्या लाऊन अनोखे आंदोलन करण्यात आले.

यावेळी बोलताना महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव म्हणाले की, पंढरपूर शहरातील रस्त्यांची चाळण झालीय, ऐन



पावसाळ्यात भाविकांना व नागरिकांना याचा खुप मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मात्र पंढरपूर नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम खाते आदी प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष आहे. त्यामुळे पडलेले हे खड्डे भाविकांना दिसावेत व हा ज्वलंत प्रश्न प्रशासकीय अधिकारी यांनाही कळावा म्हणून आम्ही आज या खड्ड्यात मेणबत्त्या पेटवून लावल्यात. जर तातडीने हा प्रश्न सोडला नाही तर आम्ही लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करू असा इशारा यावेळी गणेश अंकुशराव यांनी दिला आहे.

हे खड्डे बुजवले च पाहिजे! अशा जोरदार घोषणा यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी दिल्या.

# वागदरीत सकल मराठा समाजतर्फे बाप-लेकीचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी : सकल मराठा समाज वागदरीतर्फे दिनकर जावळे सरांची नात कु. सृष्टी अजित जावळे हिने बारावी सायन्समध्ये घवघवीत यश मिळवून मुंबईतील एमजीएम कॉलेजमध्ये एम.बी.बी.एस. प्रवेश मिळवला तसेच तिचे वडील अजित दिनकर जावळे यांना आयर्न केमिकल्स कंपनीमध्ये डेप्युटी जनरल मॅनेजर पदावर बढती मिळाल्याबद्दल दोघांचा शाल, फेटा व पुष्प-गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



कु. सृष्टीचा सत्कार ज्येष्ठ समाजबंधू भाऊराव पाटील यांच्या हस्ते तर अजित जावळे यांचा सत्कार ट्रस्टचे उपाध्यक्ष तानाजी हेबळे यांच्या हस्ते झाला. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष शिवाजी सावंत, सुनील सावंत, श्याम बाबर, स्वामीराव यादव, सुधाकर फुटाणे, गणेश शिंदे, मारुती शिंदे, राज शिंदे, एकनाथ माने, चंद्रकांत कणसे, मनोज सावंत, राम मोरे, लखन मोरे, विशाल सावंत, मनोज शिंदे, धोंडप्पा नंदे, महादेव सोनकवडे, दिनकर जावळे, प्रदीप जावळे, जावळे कुटुंबीय व इतर समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी अनेक समाजबांधवांनी आपले

**माणसाने एकमेकांच्या सुखदु:खात सामील झालं पाहिजे : दिनकर जावळे सर**

विचार व्यक्त करताना शिक्षणाशिवाय जीवनात तरणोपाय नाही. शिक्षणामुळे आर्थिक स्थैर्य व सामाजिक प्रतिष्ठा मिळते. आपल्या प्रगतीतून समाजालाही हातभार लावला पाहिजे असे मत व्यक्त केले.

गुरुवर्य दिनकर जावळे सरांनी आपल्या भाषणात माणसाने एकमेकांच्या सुखदु:खात सामील झालं पाहिजे. एकोपा आणि आधारामुळे समाजात आर्थिक व सामाजिक सुधारणा घडते, हा आपणा सर्वांसाठी अभिमानाचा विषय आहे असे सांगितले. तसेच भाऊराव पाटील घराण्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत ग्रामदैवत परमेश्वरावरील आपली श्रद्धा अधोरेखित केली.

कु. सृष्टीने सत्काराला उत्तर देताना आपल्या आजी-आजोबा, आई-वडील व समाजबांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तर अजित जावळे यांनी आपल्या यशाचे संपूर्ण श्रेय आई-वडिलांना देत मी जो काही आहे तो केवळ माझ्या आई-वडिलांमुळेच आहे असे सांगून समाजबांधवांच्या प्रेम व आपुलकीबद्दल मन:पूर्वक आभार मानले. उपस्थित बांधवांच्या उत्स्फूर्त सहभागाने व जावळे घराण्याच्या उत्तम पाहुणचारामुळे हा छोटेखानी पण हृदयस्पर्शी सत्कार समारंभ आनंदात संपन्न झाला.

# सिंदखेडराजा व देऊळगाव राजा दोन्ही तालुकाना सरसगट ओला दुष्काळ जाहीर करा :अतुलभाऊ भुसारी पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा व देऊळगाव राजा तालुक्यात जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर या तिन्ही महिन्यात सातत्य पूर्ण पाऊस मुसळ धार पडत आहे, दोन्ही तालुक्यातील मंडळ मध्ये अतिवृष्टी, पडझड, ढगफुटी, ढगाळ वातावरणा मुळे सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद इत्यादी खरीप पिकाची पुरती वाट लागली आहे नदी, नाले, ओढे व ओढे काठची करोडो टन माती व पिके वाहून गेली आहेत अतिवृष्टी मुळे घराची पडझड झाली आहे गुरे,ढोरे पशुधन वाहून गेले आहे सिंदखेडराजा व देऊळगाव राजा तालुक्यातील शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झालें आहे त्या मुळे संपूर्ण दोन्ही तालूकयात अति वृ ष्टी झाल्या मुळे शेतीचे मशागती चे कामे ठप्प झाली आहे कीड व रोगाचा प्रादुर्भाव मुळे पिकाचे नुकसान झालें आहे शेतकरी आर्थिक संकटा मध्ये सापडला आहे त्या मुळे सिंदखेडराजा व देऊळगाव राजा तालूका सरसगट ओला दुष्काळ जाहीर करून तात्काळ आर्थिक मदत देऊन शेतकऱ्याची कर्ज माफी करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते अतुलभाऊ भुसारी पाटील यांनी केली.

# मोफत आरोग्य तपासणीने देवी भक्तांची सेवा; रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईटचा उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, सोलापूर, श्री. रूपा भवानी देवस्थान ट्रस्ट, नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन सोलापूर शाखा, निमा वूमेन्स फोरम, जिज्ञासा महानगर सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्र मोहोत्सवाचे औचित्य साधून सोलापूरच्या आराध्य दैवत कुलस्वामिनी श्री. रूपा भवानी देवस्थान येथे दर्शनास येणाऱ्या भक्तांकरीता मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या तपासणी शिबिराचे उद्घाटन श्री. रूपा भवानी देवस्थ-




ान ट्रस्टचे अध्यक्ष मल्लिनाथ मसरे व एम. आय. डी. सी. पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र बंडगर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोटरी ई क्लब ऑफ सोलापुर इलाईटचे अध्यक्ष बालमुकुंद राठी, सचिव रोशन भुतडा, असिस्टंट गव्हर्नर अजय डोईजोडे, डॉ. सौरभ ढोपरे, व्यंकटेश सोमाणी, राहुल डांगरे, प्रकाश वाले, राजशेखर हिरेहब्बू, बाळासाहेब मुस्तारे, एफ.पी. ए. आय. सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, निमा सोलापूर शाखेचे अध्यक्ष डॉ. नागनाथ जिड्डीमनी, सचिव डॉ. अभिजीत पुजारी, माजी अध्यक्ष डॉ. रविराज गायकवाड, महिला शाखेच्या अध्यक्षा डॉ. श्रुती मराठे, खजिनदार डॉ. अश्विनी देगावकर, सदस्या डॉ. महानंदा हिटनळी, दयानंद कॉलेजच्या एन. एस. एस. विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुचित्रा पाटणकर, डॉ. महेश बिल्लूरे, डॉ. अक्षय स्वामी, डॉ. सुरेश धायगोंडे, डॉ. अजित गरड, डॉ. प्रवीण ननवरे, डॉ. योगेश उठगीकर, डॉ. समर्थ वाले, डॉ. भक्ती दहिटणे, डॉ. तेजस्वी जावीर, डॉ. सिद्धाराम चोरमुले आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मंदिरात येणाऱ्या भाविकांची आरोग्य तपासणीच्या माध्यमातून हिमोग्लोबिन, शुगर, आय. सी.टी.सी. आदी रक्ताच्या तपासण्या, रक्तदाब तपासणी, वजन तपासणी, कुटुंब नियोजन साधनांचे वाटप, प्रजनन आरोग्य व कुटुंब कल्याण या विषयावरील माहिती पत्रकांचे वाटप, सामान्य आरोग्य तपासणी करून व्याधींवर औषधोपचार करण्यात आला. आयोजित तपासणी शिबिरातील पहिल्या दिवशी ४१८ भाविकांची तपासणी करण्यात आली.

उद्घाटनाप्रसंगी बोलताना प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर म्हणाले की, नवरात्र महोत्सवाच्या काळात रूपा भवानी देवस्थान येथे येणाऱ्या भाविकांना दि. २३ जुलै २०२५ ते दि. ६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत आरोग्य सेवा देणे सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. रूपा भवानी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष मल्लिनाथ मसरे म्हणाले की, आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात जास्तीत भाविकांनी सहभागी होऊन याचा लाभ करून घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी केले. स्वागत प्रा.डॉ. एन. बी. तेली, प्रास्ताविक व्यंकटेश कंची यांनी केले तर आभार आकाश गायकवाड यांनी मानले.

**त्वरित पंचनामे करून मदत करण्याचे प्रशासनाला आदेश**

# आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांची पूरग्रस्त भागास भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : सांगोला तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत असल्याने तालुक्यातील कडलास, सोनंद व इतर काही भागात जोरदार पाऊस झाल्याने पावसाचे पाणी नागरी वस्तीत शिरल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आज पूरग्रस्त भागाला भेट देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या आणि स्थानिक प्रशासनाला त्वरित पंचनामे करून मदत पोहोचवण्याचे निर्देश दिले. या तात्काळ दिलासा देण्याचे आश्वासन दिले.



भेटीदरम्यान आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी पूरग्रस्तांच्या वेदनांना हाक देत

आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आज सकाळीच पूरप्रवण भागाचा दौरा केला. पूरग्रस्त शेतकरी, महिलांशी संवाद साधताना आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख म्हणाले, प्रशासनाने त्वरित पंचनामे सुरू करावेत तसेच पूरग्रस्तांना आर्थिक मदत, धान्य, वैद्यकीय सेवा आणि घरबांधकामासाठी तात्काळ निधी उपलब्ध करून द्यावा. यावेळी आमदार महोदयांनी तहसीलदार संतोष कणसे यांच्याशी संपर्क साधून तत्काळ मदत करण्याचे निर्देश दिले.

# आमदार कुमार आयलानी यांच्या हस्ते उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालय नेत्ररोग विभागचे ओपीडी उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे : उल्हासनगर: निरोगी महिला, सशक्त कुटुंब ही मोहीम १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत साजरी केली जाणार आहे. याचाच एक भाग म्हणून, उल्हासनगर येथील सेंट्रल हॉस्पिटलमध्ये नमो नेत्र अजिंक्य स्वास्थ्य अभियान सुरू करण्यात आले, ज्याचे उद्घाटन मंगळवारी आमदार कुमार आयलानी यांच्या हस्ते झाले.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून नेत्ररोग विभागाच्या ओपीडीचे उद्घाटन करण्यात




आले. डॉ. नंदापूरकर, शफीक गोरे, डॉ. संतोष वर्मा, उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. मनोहर बनसोडे, मंगला चंदा आणि राजू तेलकर यांच्यासह इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.